सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४ था ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## साहित्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे प्रवेशद्वारास जेसीबीच्या धडकेने पडले तडे

### जालना उड्डाणपुलावर रास्ता रोको; जबाबदारी ठरवा, गुन्हे दाखल करा - समाजबांधव



घडले की घडविले, समाजबांधव संतप्त; निष्पक्ष चौकशीची आवश्यकता

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने नुकत्याच उभारलेल्या प्रवेशद्वाराला एका जेसीबीने धडक दिल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. हे प्रवेशद्वार जालना महानगरपालिकेने आमदार निधीतून सुमारे ७.५ लाख खर्चून उभारले होते. हे काम १ ऑगस्ट अण्णाभाऊ साठे जयंतीच्या काही दिवसांपुर्वीची पूर्ण झाले होते. जेसीबीच्या धडकेने प्रवेशद्वाराला तडे गेले आहेत. धडकेनंतर संतप्त समाजबांधव उड्डाणपुलावर जमा होऊन रस्ता रोको करत प्रवेशद्वार पूर्ववत बांधण्यासह संबंधीत जेसीबी मालकासह, आयुक्तावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे, तोपर्यंत माघार घेणार नसल्याचा पवित्रा समाजबांधवांनी घेतला होता.

जेसीबीच्या चालकाकडून अपघाताने झाले की हे प्रवेशद्वार पाडण्याचे षडयंत्र होते याचा शोध घेण्याचीही मागणी यावेळी समाजबांधवांनी केली. या भागातून राशनच्या ट्रकसह इतर अन्य ट्रक वाहतुक मोठ्या प्रमाणात होत असते. त्यामुळेच कदाचित हा प्रकार घडवून आणल्या गेला का या दृष्टिनेही तपास करण्याची मागणी होत आहे.

समाजबांधवांना पोलीसांनी आश्वासनानंतर वाद निवळला.

प्रवेशद्वाराचे झालेले काम हे आमदार निधीतून झालेले सुमारे ७.५ लाख रुपये खर्चून करण्यात आले होते. कामाचे निर्माण मानके, निविदा प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उंच वाहनांसाठी आवश्यक उभ्या मोकळ्या उंचीची (vertical clearance) गणना झाली का? PWD/IRC मार्गदर्शक तत्वे, अग्निशमन/आपत्कालीन वाहने, PDS ट्रक यांचा विचार डिझाइनवेळी झाला का? कामाचा ठेकेदार/पर्यवेक्षक/तांत्रिक अधिकारी यासाठी नेमका कोण जबाबदार?

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्मृतीतील प्रतीक-पुरुष. त्यांच्या नावाने उभारलेल्या कोणत्याही स्मारकात सुरक्षा, सन्मान, उपयुक्तता या तिन्हींचा समतोल राखणे आवश्यक आहे.

### मनपाच्या अधिकाऱ्यांनी काढला पळ...

घटनेनंतर जालना शहर महानगर पालिकेतील दोन-तीन अधिकारी घटनास्थळावर दाखल झाले होते. त्यांनी समाजबांधवांशी बोलून संबंधीत जेसीबी मालकाकडून साडे-सात लाख रुपये मनपाच्या नावाने चेक घेऊन तात्काळ बांधकाम करून देऊ असा तोंडी प्रस्ताव ठेवला. मात्र, समाजबांधव जेसीबी चालक, मालकासह आयुक्तावर कारवाई करावी यावर ठाम होते. शाासकीय मालमत्तेचे नुकसान झाले म्हणून गुन्हा दाखल करण्यात येईल असे सांगत या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी तेथून पळ काढला.




## अन्यायग्रस्त शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित

### शिक्षणाधिकाऱ्यांनी नेमली चार सदस्यीय चौकशी समिती




**जालना । प्रतिनिधी -** न्याय मागण्यासाठी कै. नानासाहेब वाघ माध्यमिक विद्यालय नजीक पांगरी ता बदनापुर येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद जालना यांच्या कार्यालयासमोर दि १४ ऑगस्ट ला उपोषण सुरू केले होते उपोषणादरम्यान प्रभारी शिक्षणाधिकारी रवी जोशी , केंद्रप्रमुख गणेश गिराम व त्यांचे शिष्टमंडळ वरिष्ठ सहाय्यक प्रसन्न कुमार जोगदंड, कनिष्ठ लिपिक अनिल भेरे यांनी मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी व उपोषण कर्ते यांच्याशी चर्चा केली. परंतु उपोषणकर्ते आपल्या मागण्यावर ठाम होते.जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार ! अशी ठाम भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली. उपोषणकर्त्यांनी दि ९ जुलै २०२५ च्या पत्रानुसार माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळू खरात यांना आपल्या वर मुख्याध्यापक तथा सचिव प्रल्हाद वाघ यांच्याकडून होणाऱ्या अन्याया विरोधात दाद मागितली होती मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सुद्धा शिक्षणाधिकारी यांच्याकडे वारंवार पत्र व्यवहार करून तसेच प्रत्यक्ष भेटीदरम्यान चर्चा केली होती त्याच अनुषंगाने २२ जुलै २०२५ ला माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी गटशिक्षणाधिकारी बदनापूर यांना पत्र देऊन सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करावा असे कळविले होते. गटशिक्षणाधिकारी बदनापूर यांनी विस्ताराधिकारी व केंद्रप्रमुख यांना पत्र देऊन चौकशी करण्याच्या सूचना देत असा खो-खो चा खेळ सुरू ठेवला व चौकशी अधांतरीच राहिली. शेवटी अन्यायग्रस्त शिक्षकांनी उपोषणाचा इशारा देताच जिल्हा परिषद प्रशाला बदनापूर या ठिकाणी शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख त्यांनी प्रत्यक्ष शाळेवर न जाताच अन्यायग्रस्त शिक्षकांचे जबाब घेतले.१३ऑगस्ट २०२५ ला सुद्धा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी अध्यक्ष सचिव कै. नानासाहेब वाघ शिक्षण प्रसारक मंडळ नाव्हा द्वारा संचलित मुख्याध्यापक कै नानासाहेब वाघ विद्यालय नजीक पांगरी यांना अन्यायग्रस्त शिक्षकांच्या सर्व मागण्या ह्या आपल्या शालेय स्तरावरील असून त्या पूर्ण कराव्यात व त्यांना उपोषणापासून परावृत्त करावे असे कळवले या पत्राला केराची टोपली दाखवत माननीय उपाध्यक्ष यांनी स्वातंत्र्य दिनानंतर आपल्या मागण्या मान्य करण्यात येईल असे अन्यायग्रस्त शिक्षकांना कळवले परंतु उपोषण कर्ते आपल्या न्याय मागण्यावर ठाम होते.मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी व त्यांचे शिष्टमंडळ यांनी शिक्षणाधिकारी यांची भेट घेतली तेव्हा शिक्षणाधिकारी यांनी संदर्भीय प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी चार सदस्य समिती नेमली त्यात पथक प्रमुख मनोज कोल्हे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जालना,श्री रवी जोशी प्रभारी उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जालना, श्रीमती विनया वडजे उपशिक्षणाधिकारी प्राथमिक जालना, श्री शिनगारे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंबड यांना १० दिवसात चौकशी करून अहवाल सादर करावा पान २ वर

युवा आदर्श

### संधीसाधू ...

झेंडा वंदना हजर
उचीत वेळ साधू
फोटोत दिसे स्पष्ट
विचीत्र संधी साधू
कुठलाही समारंभ
लक्ष सकलांचे वेधू
मंदिर मशीदी दिसे
भक्त आम्ही भोंदू
जिथे तिथे चमका
नाव स्वताचे गोंदू
स्वार्थ दिसतो जिथे
तिथे सुखानी नांदू
जिथे तिथे अंधभक्त
लोकां बनवी बुद्धु
घोळात घोळ घाली
तयार आमचे पिद्दू
डोके टोपी घालाया
सडला आतला मेंदू
मुर्खाच्या बाजारात
शहाणा होऊन नांदू

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## विद्यार्थ्यांचा राजकारणातील सक्रिय सहभाग लोकशाही प्रक्रियेला बळकट करतो - राहुल लोणीकर

### भाजपा मंठा तालुका विद्यार्थी आघाडी कार्यकारणी जाहीर; अध्यक्षपदी विवेक खराबे यांची निवड

**मंठा । प्रतिनिधी -** विद्यार्थी आणि राजकारण यांचा संबंध अनेक अंगांनी महत्वाचा आहे. विद्यार्थी हे समाजाचा एक महत्वाचा घटक असल्याने, राजकारणात त्यांचा सहभाग आणि भूमिका नेहमीच चर्चेचा विषय ठरलेला आहे. विद्यार्थी अनेकदा सामाजिक आणि राजकीय समस्यांवर सक्रियपणे प्रतिक्रिया देतात. शिक्षण, पर्यावरण, सामाजिक न्याय अशा विविध चळवळींमध्ये सहभागी होतात आणि आपला आवाज उठवतात. विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग देशाच्या विकासासाठी आवश्यक आहे. ते नवीन कल्पना आणि दृष्टिकोन घेऊन येतात, ज्यामुळे धोरणे आणि योजना अधिक प्रभावीपणे तयार करता येतात. असे प्रतिपादन भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर यांनी केले.

मंठा येथे माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा विद्यार्थी आघाडीची मंठा तालुका कार्यकारिणीची घोषणा आज राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. मंठा तालुका भाजपा विद्यार्थी आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी विवेक दत्ताराव खराबे यांची निवड करण्यात पान २ वर




## मनरेगा अंतर्गत बांबू लागवड प्रस्तावाच्या मंजुरीला गती द्यावी

### पालकमंत्री मुंडे यांच्याकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी -** शाश्वत उत्पन्न देणारे तसेच पर्यावरणपूरक पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत प्रती हेक्टर सात लाख रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येत असल्याने, योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर उत्साह दाखविला जात आहे. मात्र, संदर्भातील प्रस्ताव मंजुरीची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने चालू आहे. परिणामी पान २ वर

## जालना तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध

### नवनिर्वाचीत संचालक मंडळाचा आमदार खोतकर यांच्या हस्ते सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध संपन्न झाली असून आज दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी भाग्यनगर येथील संपर्क कार्यालयात शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार छोटेखानी कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी आमदार खोतकर यांनी सांगितले की जालना खरेदी विक्री संघाची निवडणूक आम्ही शिवसेनेच्या वतीने माजी चेअरमन अच्युतराव कदम यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लढवली असून ती पूर्णतः बिनविरोध पार पडली,आणी पुन्हा एकदा ही संस्था बहुमताने आम्ही आमच्या ताब्यात घेण्यासाठी यशस्वी झालो आहोत याचा आपल्याला अभिमान आहे. या निवडणुकीत खासदार कल्याणराव काळे, आमदार हिकमत दादा उढान, माजी मंत्री राजेश भैय्या टोपे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, भास्करराव आंबेकर यांचे सहकार्य लाभले असून त्यांचेही आपण आभार व्यक्त करतो. जालना तालुका खरेदी विक्री संघाची परिस्थिती अत्यंत डबघाईला आली असून या आर्थिक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी आपण सर्व तरी प्रयत्न करणार असून यासाठी लागेल ती मदत खरेदी विक्री संघ या संस्थेला करण्यात येईल अशी आमदार खोतकर यांनी सांगितले.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते यांच्यासह खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित संचालक अच्युतराव कदम, शरदराव खडके, पान २ वर



# संपादकीय

## असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय चेहरा, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ज्योती चांदेकर या मराठी रंगभूमीवरील नावाजलेल्या अभिनेत्री होत्या. केवळ रंगभूमीवरच नाही तर चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. ज्योती चांदेकर यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. लहान असतानाच त्यांनी काही नाटकात अभिनय केला. पुढे अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी नाटकात भूमिका केल्या. त्यांनी अभिनय केलेले सुंदर मी होणार आणि मिसेस आमदार ही नाटके रंगभूमीवर तुफान गाजली. त्यातील त्यांच्या भूमिका त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरल्या. या भूमिकांनी त्यांना रंगभूमीवर असामान्य अभिनेत्री असा गौरव मिळवून दिला. या नाटकातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यानंतर त्यांनी चित्रपटाकडे आपला मोर्चा वळवला. ग्यानबाची मेख हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यानंतर त्यांनी तिचा उंबरठा, ढोलकी, सुखांत, मी सिंधुताई सपकाळ, फुलवात, देवा, श्यामची आई या चित्रपटातूनही भूमिका केल्या. ज्योती चांदेकर यांनी रणजीत पंडित यांच्याशी विवाह केल्यावर त्यांना पौर्णिमा व तेजस्विनी या दोन मुली झाल्या. तेजस्विनी ही मराठी चित्रपट सृष्टीतील सध्याची आघाडीची अभिनेत्री आहे. लग्नानंतरही ज्योती चांदेकर यांनी आपले नाव बदलले नाही. ज्योती चांदेकर यांच्या अभिनय कारकिर्दीसाठी त्यांच्या पतीने मोठा त्याग केला. ज्योती चांदेकर यांची अभिनय कारकिर्द सुरू रहावी यासाठी त्यांच्या पतीने आपली नोकरी सोडली आणि मुलींचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. ज्योती चांदेकर यांच्या कारकिर्दीत अनेक चढ उतार निर्माण झाले पण त्या डगमगल्या नाहीत. आलेल्या संकटावर त्यांनी मात केली आपली अभिनय कारिकर्द यशस्वी केली. चित्रपट आणि नाटकासोबतच त्यांनी टीव्हीवरील मालिकेतही भूमिका केल्या. त्यांनी साकारलेली 'ठरलं तर मग' मालिकेतील पूर्णा आजी, मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील सिंधुताई सपकाळ या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. देवा एक अतरंगी या चित्रपटामधील त्यांची भूमिका देखील प्रेक्षकांना भावली. ज्योती चांदेकर यांनी असंख्य नाटकं आणि मालिका यांच्या माध्यमातून आपल्या अभिनयकलेचा अविस्मरणीय ठसा उमटवला. ठरलं तर मग आता या मालिकेत त्यांनी साकारलेली पूर्णा आजी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या भूमिकेने त्यांना घराघरात पोहचवले. ज्योती चांदेकर या संपूर्ण महाराष्ट्राची लाडकी पूर्णा आजी बनल्या. याच मालिकेत अभिनय करत असताना त्या आजारी पडल्या आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. पडद्यावरील त्यांची सहजसुंदर अभिव्यक्ती, आत्मीय भाव आणि प्रांजळ संवादकळा प्रेक्षकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आई, जिव्हाळ्याची कलाकार, असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जंगलतोड, शहरीकरण व औद्योगिकरणाला जबाबदार कोण? याचे प्रायश्चित्त मुक्या पशुपक्षांनी किंवा प्राण्यांनी का भोगावे?

आज देशात वाढते प्रदुषण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, वृक्षांची कत्तल आणि मोठमोठे टॉवर यामुळे स्थल,जल, वायूचे वातावरण दुषित झाले आहे यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक वृक्ष,पशुपक्षी लुप्त झाले आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.परंतु मानव बुध्दीजीवी प्राणी असल्यामुळे मुक्या प्राण्यांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा अन्याय होणार नाही याची जातीने काळजी घेतली पाहिजे व योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.अन्यथा मुक्या प्राण्यांमध्ये व आपल्यामध्ये काहीच फरक रहाणार नाही.आज राज्यासह संपूर्ण देशात मानवांच्या सुखसुविधांसाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू असुन देशातील अनेक भागांत शहरीकरण, औद्योगिकरण, परमाणु परिक्षण व रस्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामुळेच मोठ्या प्रमाणात जंगलसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत आणि हा प्रकार फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगात सुरू आहे. परंतु याचे प्रायश्चित्त आज मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागत आहे. देशात दिवसेंदिवस लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि लावारीस कुत्र्यांची संख्या वाढण्यामागे स्थानिक प्रशासन जबाबदार आहे.कारण स्थानिक प्रशासनांना माहीत असते की कुत्रा चावला तर त्याचा काय परिणाम होतो तरी स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असते त्यामुळेच आज भारतात लावारीस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.एका आकडेवारी नुसार असे सांगण्यात येते की देशात दररोज १० हजार नागरिकांना कुत्रे चावा घेतात व यात अनेकांना रेबीज आजार होतो किंवा अनेकांचा मृत्यू सुध्दा होतो.यावरून आपण समजू शकतो की स्थानिक प्रशासनाच्या चुकांमुळे हा भयंकर प्रकार होत. स्थानिक प्रशासनाने वेळीच लावारीस कुत्र्यांवर आळा घातला किंवा नसबंदी केली असती तर अनेकांचा जीव वाचला असता किंवा चाव्यांचे प्रकार टाळता आले असते.त्यामुळे आता आदेश, निर्देश खूप झाले आता अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत कबुतरांना खाद्यबंदीचा वाद जोरदार उफाळल्याचे दिसून येते आणि हा मुद्दा आता मुंबई महापालिका,सरकार आणि हायकोर्ट अशा पध्दतीने सुरू आहे.महत्वाचा मुद्दा असा की कबुतरांना खाद्यबंदीचा का करावी? आपण संपूर्ण जंगल संपुष्टात आणले कबुतर हा तर छोटासा पक्षी आहे.आज जंगलतोडीमुळे वाघ,बंदर, बिबट्या,अस्वल इत्यादी अनेक हिंसक पशु शहरात व गावात सरळ प्रवेश करीत आहेत व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.बंदरांचा विचार केला तर जनु काय त्यांच्यासाठी जंगल संपुष्टात आले की काय असे त्यांना वाटत आहे.त्यामुळे आज देशातील अनेक शहरांत किंवा गावांमध्ये बंदर मोठ्या प्रमाणात दिसून येतात व मोठ्या प्रमाणात नुकसान सुध्दा करतात.परंतु याला कारणीभूत कोण?याचा विचार सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन का करीत नाही? म्हणजे आपणच त्यांच्यावर अत्याचार व अन्याय करायचा आणि आपण त्यांच्या पासून नुकसानीचा धडा सर्वसामान्यांना शिकवायचा ही बाब कितपत योग्य म्हणावी! कबुतरांच्या बाबतीत वाढता रोष पहाता कबुतरखाना बंद करण्याच्या भुमिकेत असलेल्या मुंबई महापालिकेने मवाळपणा दाखवित सकाळी ६ ते ८ या दोन तासांच्या काळात कबुतरांना खाद्य टाकण्याची परवानगी देण्याच्या विचारात असल्याची माहिती मुंबई उच्च न्यायालयाला १३ ऑगस्टला दिली.माझ्या माहितीनुसार मुंबई महापालिका किंवा राज्य सरकार मुक्या पक्षांवर (कबुतरांवर) एकाकी त्यांच्या खाण्यावर बंदी घालु शकत नाही.कारण कबुतरांसारख्या अनेक जंगली पक्षांना शहरात आणण्यास स्वतः सरकार, प्रशासन व स्थानिक प्रशासन जबाबदार आहे.त्यामुळे कबुतर असो व अन्य प्राणी त्यांच्या खाण्यापीण्याची व्यवस्था सरकारने प्रथम करावी नंतर सर्वसामान्यांना सांगावे की त्यांना खाद्य टाकावे किंवा नाही. गुन्हा सरकारने व प्रशासनाने करावा आणि त्याचे प्रायश्चित्त मुक्या पशुपक्षांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा! असे सांगितले जाते की कबुतरांमुळे ६० प्रकारचे आजार होऊ शकतात त्यात मुख्यत्वे करून अस्थमा सारख्या आजारांचा समावेश आहे.ही बाब ठीक याचे आम्हीपण समर्थ करतो.परंतु शहरात कबुतरांचा एवढा लोंढा कसा काय आला यांचाही विचार सरकारने केला पाहिजे.कारण एवढे कबुतर एकाएकी शहरात आले नसुन ते प्रशासनांच्या चुकांमुळे आले आहेत यालाही नाकारता येणार नाही. त्यामुळे सरकारने कबुतरखान्याच्या बाबतीत गांभीर्याने विचार करावा नंतरच योग्य तो निर्णय घ्यावा.आजही राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट गायी फिरतात त्यांना कोण खाद्य खाऊ घालणार याचा विचार सरकार का करीत नाही? मोकाट गायींची सुरक्षा निश्चित करण्यासाठी व योग्य खाद्य मिळावे यासाठी सरकार त्यांना गोशाळेत का नेत नाही?ते तर पाळीव प्राणी आहेत.म्हणजेच सरकार,प्रशासन व स्थानिक प्रशासन लोकांना सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण अशी परिस्थिती सरकारची दिसून येते.कुत्रा हा पाळीव प्राणी आहे.परंतु लावारीस कुत्र्यांची वाढती संख्या पहाता त्यांचा बंदोबस्त स्थानिक प्रशासनाने ताबडतोब करायला हवा. त्याचप्रमाणे मोकाट गायी शहरात मोठ्या प्रमाणात फिरतात अशा परिस्थितीत त्यांच्या खाण्यामध्ये अनेक विषेली पदार्थ सुध्दा येतात व यामुळे त्यांची जिवीत हाणी सुध्दा होते.त्यामुळे सरकारने अशा प्राण्यांची व्यवस्था ताबडतोब गोशाळेत केली पाहिजे.त्याचप्रमाणे कबुतर,बंदर किंवा अन्य जंगलातील पशुपक्षी शहरात किंवा गावात का येत आहे याचाही गांभीर्याने विचार करून ताबडतोब जंगलतोड थांबविली पाहिजे व वाढते शहरीकरण रोखले पाहिजे अशा पध्दतीने सरकारने विचार केला तर कालांतराने जंगलात सहवास करणारे संपूर्ण पशुपक्षी शहरात किंवा गावात येने हळूहळू कमी होईल व त्यांचे आयुष्य वाढेल. यासाठी सरकारला वृक्षलागवडीचा मोठा उपक्रम राबविने गरजेचे आहे.कारण वृक्षांच्या अभावामुळे पशुपक्ष्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.या संपूर्ण गोष्टींचा विचार सरकारने मोठ्या गंभीरतेने घेतला पाहिजे.पशुपक्षांच्या बाबतीत निर्माण झालेले वैरत्व संपुष्टात आणण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्या अनुषंगाने सरकारने पाऊल उचलायला हवे व मानव आणि पशुपक्षी यांच्यातील मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.पुर्वी चिऊताईच्या नावांनी आई घास भरवायची,परंतु आज चीमण्या सुध्दा अनेक क्षेत्रांतुन लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचप्रमाणे कावळे सुध्दा कमी प्रमाणात दिसतात. मानवाने स्वतःच्या आरोग्याची जोपासना अवश्य करावी.परंतु पशुपक्ष्यांच्या रक्षणाचा सुध्दा विचार करावा.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# फिफा वर्ल्ड कप; विक्रमी सहभाग आणि महासंग्रामाची तयारी

**क्रीडा विश्वात सध्या उत्साहाची लाट पसरली आहे. फुटबॉलप्रेमींचे लक्ष लागून असलेल्या फिफा वर्ल्ड कप २०२६ चा महासंग्राम जवळ येत आहे. यंदाचा वर्ल्ड कप अनेक अर्थांनी खास असणार आहे. पहिल्यांदाच, या स्पर्धेत तब्बल ४८ संघ सहभागी होत असून, याचे यजमानपद उत्तर अमेरिकेतील तीन देश – अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको – संयुक्तपणे भूषवत आहेत.**

**विस्तारित स्वरूप आणि नव्या नियमांची अंमलबजावणी**

यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये सहभागी होणाऱ्या संघांची संख्या वाढल्यामुळे स्पर्धेचे स्वरूपही बदलले आहे. ४८ संघांची विभागणी १२ गटांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक गटात चार संघ असतील आणि यातून पुढच्या फेरीत जाण्यासाठी ८ संघांमध्ये जोरदार स्पर्धा पाहायला मिळेल. या बदलामुळे छोट्या आणि तुलनेने दुर्बळ समजल्या जाणाऱ्या संघांनाही आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे, ज्यामुळे स्पर्धेची रंगत अधिक वाढेल.

**उत्तर अमेरिकेतील भव्य आयोजन**

हा वर्ल्ड कप केवळ फुटबॉलचा खेळ नसून, तो उत्तर अमेरिकेतील एक भव्य सांस्कृतिक महोत्सव ठरणार आहे. अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडामधील प्रमुख शहरांमध्ये सामने आयोजित केले जातील. यामुळे जगभरातील चाहते या देशांमधील विविध संस्कृतींचा अनुभव घेऊ शकतील. स्पर्धेचा अंतिम सामना १९ जुलै २०२६ रोजी न्यूयॉर्कमधील मेटलाइफ स्टेडियम (न्यू जर्सी) येथे होणार आहे. हा क्षण फुटबॉलच्या इतिहासातील एक अविस्मरणीय सोहळा ठरेल, यात शंका नाही.

**दिग्गजांची अखेरची संधी?**

या स्पर्धेत जगातील काही महान खेळाडूंचा सहभाग अपेक्षित आहे. लिओनेल मेस्सी, ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि कायलियन एमबाप्पे यांसारखे जागतिक दर्जाचे खेळाडू आपापल्या देशासाठी हा प्रतिष्ठित किताब जिंकण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावतील. मेस्सी आणि रोनाल्डो यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंचा कदाचित हा शेवटचा वर्ल्ड कप असू शकतो, त्यामुळे त्यांच्यासाठी हा विजय त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोच्च शिखर असेल. युवा खेळाडू कायलियन एमबाप्पे पुन्हा एकदा आपल्या संघाला विजेतेपद मिळवून देण्यास उत्सुक असेल.

स्टेडियममध्ये गर्दीने भारलेल्या वातावरणात, हजारो प्रेक्षक आपल्या संघाचे झेंडे फडकावत आणि विजयगीते गात खेळाडूंचा उत्साह वाढवताना दिसतील. खेळाडूंच्या मनात आपल्या देशाचा अभिमान आणि विजेतेपदाची भूक असेल. या वर्षी 'गोल्डन बॉल' चा मान कोण पटकावतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. हा वर्ल्ड कप केवळ विजेतेपदासाठीचा संघर्ष नसून, तो फुटबॉलच्या इतिहासातील एक नवा अध्याय लिहिणारा महासंग्राम ठरेल.

**- अमोल जाधवराव.**
**मो. ९१५६४८६९३१**




## पान १ वरुन

### अन्यायग्रस्त शिक्षकांचे ...

असे आदेशित केले त्यामुळे उपोषणकर्त्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला उपोषण तात्पुरते स्थगित केले व सदरील प्रकरणाची चौकशी करून मागण्या मान्य झाल्या नाही आणि अन्याय करणाऱ्या मुख्याध्यापक तथा सचिव यांच्यावर योग्य ती कारवाई झाली नाही तर उपोषण पूर्ववत सुरू केल्या जाईल असा इशारा देण्यात आला आहे व त्याचप्रमाणे उपोषणकर्त्याच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने सुद्धा तीव्र आंदोलनाचा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे उपोषणा दरम्यान मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, सदस्य प्रेमदास राठोड, आर एफ कुरेशी, जिल्हा सचिव संजय येळवंते, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, मार्गदर्शक डॉ मारुती तेगमपुरे, कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद, उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, सहसचिव प्रद्युम्न काकड,प्रसिद्धी प्रमुख पटेल,युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, माजी सिनेट सदस्य डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तथा भगतसिंग शिक्षक व शिक्षकेतर पतसंस्था संचालक भागवत काकडे, महिला प्रतिनिधी शिरीन बेगम शहा, मन्सूर शेख,रशीद शेख, संजय चव्हाण, गणेश मेहेत्रे,सचिन अंबडकर,राहुल साळवे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी केदार, मार्गदर्शक तथा सेवानिवृत्त शिक्षक गौतम बनसोडे, प्रा दत्ता देशमुख, प्रा राज्यक्रांती वलसे यांची विशेष उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांच्या राजकारणातील ...

आली. यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग लोकशाही प्रक्रियेला बळकट करतो. ते निवडणुकीत मतदान करून, राजकीय विषयांवर चर्चा करून आणि सामाजिक कार्यात सहभागी होऊन लोकशाही प्रक्रियेत योगदान देतात. शिक्षणातील राजकारण विद्यार्थ्यांच्या भविष्यावर आणि समाजावर परिणाम करते. शैक्षणिक धोरणे, अभ्यासक्रम आणि शिक्षणाच्या संधींवर परिणाम करणारे निर्णय राजकारणातून घेतले जातात असेही राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

भाजपा विद्यार्थी आघाडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि समस्यांवर आवाज उठवण्यासाठी महत्वाचे ठरतात. या संघटनांच्या माध्यमातून विद्यार्थी सामूहिकरित्या निर्णय घेतात आणि आपल्या हक्कांसाठी लढतात. विद्यार्थी आपल्या सक्रियतेतून, सामाजिक बदलांसाठी एक महत्वाची शक्ती बनू शकतात. ते समाजाला नवी दिशा दाखवू शकतात आणि चांगले भविष्य घडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकारणात सक्रिय सहभाग घेतल्याने विद्यार्थी जबाबदार नागरिक बनतात. त्यांना समाजाच्या समस्यांची जाणीव होते आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी ते प्रेरित होणे आवश्यक आहे. विद्यार्थी राजकारणात सहभागी होऊन नेतृत्व क्षमता विकसित करतात. ते विविध विषयांवर चर्चा करण्यास, आपले मत मांडायला आणि इतरांना सोबत घेऊन काम करायला शिकणे आवश्यक असल्याचे देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले.

अत्यंत उत्साहाच्या वातावरणात भारतीय जनता पक्ष मंठा तालुका विद्यार्थी आघाडी कार्यकारणी जाहीर जाहीर केल्यानंतर लगेचच स्नेहभोजन कार्यक्रम कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थी आघाडीच्या अध्यक्षपदी विवेक दत्तराव खराबे तर उपाध्यक्षपदी सुजल जाधव, आदित्य दवणे, अशोक खराबे, प्रमोद गोंडगे, अविनाश राठोड मयूर बागल, सरचिटणीसपदी गणेश खरात, उमेश वायाळ, अजय खरात, चिटणीसपदी श्रीकांत बोंढारे, पंढरीनाथ गडदे, सुरज चव्हाण, निवास राठोड, यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांची विविध पदावर व सदस्यपदी नियुक्ती झाली. या सर्व पदाधिकाऱ्यांना भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती संदीप गोरे मंठा शहराचे नगराध्यक्ष वैजनाथ नाना बोराडे बाजार समितीचे माजी उपसभापती राजेश मोरे जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव बोराडे माजी नगराध्यक्ष कैलास बापू बोराडे,अजय अवचार, प्रसादराव गडदे, सरपंच परिषदेचे मंठा तालुकाध्यक्ष अमोल मोरे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद जाधव जालना ग्रामीण युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष विलास घोडके यांच्यासह लोकप्रतिनिधी, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मनरेगा अंतर्गत ...

शेतकऱ्यांचा हिरमोड होत असून, या प्रक्रियेला गती मिळावी यासाठी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पालकमंत्री तथा पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे केली आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त ना. पंकजाताई मुंडे जालना दौऱ्यावर असताना, आ. अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी डॉ. कुलकर्णी यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बांबूपासून निर्मित विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती आणि बांबूचे घड्याळ भेट देत या पिकाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी ड. भरत मंत्री, योगेश शिंदे, शैलेश बजाज, संजय लोंढे, राजू कोल्हे, अतुल लड्डा, शरद खेडेकर आदी शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. सुयोग कुलकर्णी म्हणाले की, बांबू लागवड ही पर्यावरणासाठी लाभदायक तसेच शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असल्याने शासनाने दिलेले अनुदान अत्यंत स्वागतार्ह आहे. मात्र, प्रस्ताव मंजुरीसाठी सरासरी दोन महिने लागतात. या कासवगतीमुळे शेतकऱ्यांची उत्सुकता कमी होत असून लागवडीच्या हंगामावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचे असलेले हे पीक वेळेत लागवड व्हावे यासाठी मंजुरी प्रक्रिया एक महिन्याच्या आत पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या संदर्भात पर्यावरण मंत्री या नात्याने सकारात्मक भूमिका घेऊन संबंधित विभागांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती शिष्टमंडळाने यावेळी केली.

### जालना तालुका ...

बाबुराव बारहाते, उदयराज तनपुरे, गणेश थोरात ,हरिभाऊ पोहेकर, धिरेंद्र वांजळे, विष्णू भुतेकर, कल्याण सांगोळे ,रामेश्वर देवडे ,ज्ञानेश्वर माऊली डुकरे, भीमराव लोंढे, शरद तळेकर, आनंद भिसे, तुळशीराम गिराम, दलसिंग पवार या संचालकांची उपस्थिती होती. या सर्वांचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शाल व पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी संघाच्या वतीने चेअरमनच अच्युतराव कदम व संघाचे एमडी श्री पटेल यांनी आमदार खोतकर यांचे या निवडणुकीत मोलाचे सहकार्य लाभले व निवडणूक बिनविरोध करून घेतली यामुळे शाल पुष्पहार देऊन सत्कार केला.


निवडून आलेल्या मंडळात विष्णू भुतेकर व दलसिंग पवार राष्ट्रवादी काँग्रेस, तुळशीराम गिराम शिवसेना उबाठा, कल्याण सांगोळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, ज्ञानेश्वर डुकरे, काँग्रेस यांचा समावेश आहे.





**शहागड ते बर्डी येथे दोन दिवसापासून पायी चालत असलेले भक्तगण कावड यात्रेत दिसून येत आहे (छायाचित्र - किरण खानापुरे)**

# जालना जिल्ह्यातील बहिणींकडून देवाभाऊंसाठी राख्यांचे संकलन



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी कार्यालयात महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्यासाठी जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्यातील बहिणींनी प्रेमाने पाठवलेल्या राख्यांचे संकलन करून माजी केंद्रीय मंत्री मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या.

या प्रसंगी ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण भाऊ कुचे, माजी आ. कैलाशशेठ गोरंट्याल, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर जिजा भांदरगे, राजेश राऊत, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे माजी नगराध्यक्ष सौ. संगीताताई गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. संध्याताई देठे, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. शुभांगीताई देशपांडे, सरपंच सौ. अश्विनीताई पवार, मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, सुनील खरे, अमोल धानुरे, महेश निकम, भगवान मात्रे, संजय आटोळे, सरचिटणीस सुनील पवार, अर्जुन गेही, धनराज काबलिये तसेच भाजपाचे सर्व पदाधिकारी, नगसेवक, मोर्चाचे अध्यक्ष, महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला मोर्चा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या सामाजिक उपक्रमाला विशेष उभारी दिली.

# शिबिरात ३६४ जणांचे रक्तदान

**जालना । प्रतिनिधी -** स्वातंत्र्य दिनानिमित्त मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत- ए-उलेमा जालना, चार्ली ग्रुप जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी जुना जालना भागातील जमजम हॉस्पिटलमध्ये आयोजित भव्य रक्तदान शिबिरात तब्बल ३६४ जणांनी रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला. या शिबिराचे उद्घाटन माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष निसार देशमुख, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदर चाउस, काँग्रेस शहराध्यक्ष अतीक खान, समाजसेवक मुस्तकीमभाई हमदुले, जुनेदभाई हमदुले, डॉ. आशीष राठोड, शिवसेना शहरप्रमुख बाला परदेशी, मुफ्ती फहीम सहाब आदी मान्यवर उपस्थित होते.

# घाणेवाडीतील संत गाडगेबाबा जलाशयाचे जलपूजन



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील घाणेवाडी येथे संत गाडगेबाबा जलाशयाचा जलपूजन सोहळा अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते पार पडला. ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे जलाशयाच्या उपयुक्ततेसोबतच स्थानिक राजकारणातही या सोहळ्याची छाप पडली आहे.

संत गाडगेबाबा हे समाजसुधारणेचे आणि स्वच्छतेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या नावाने उभारलेला जलाशय हा केवळ सिंचन सुविधा देणारा प्रकल्प नाही, तर तो सामाजिक परिवर्तन आणि प्रगतीचे प्रतीक म्हणून पाहिला जातो. जलपूजन सोहळ्यात गाडगेबाबांच्या कार्याचा उल्लेख करून खोतकर यांनी ग्रामस्थांना जलसंधारणाची आणि पाणीटंचाईविरोधी लढ्याची प्रेरणा दिली. ग्रामीण भागात पाणी हेच मुख्य विकासाचे साधन असल्याने या जलाशयामुळे घाणेवाडी व परिसरातील शेतकऱ्यांसह पिण्याच्या पाण्यासाठी नविन जालनेकरांना दिलासा मिळाला आहे.

या जलाशयामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची हमी मिळाल्याने उत्पादनक्षमता वाढली आहे. पिकांचे विविधीकरण शक्य झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित सुधारण्यास मदत होत आहे. विशेषतः पावसाच्या अनिश्चिततेच्या काळात अशा जलसाठ्यांचा फायदा हा शेतकऱ्यांसाठी आधारवड ठरतो.

जलाशय जलपूजनासारख्या कार्यक्रमांचा ग्रामीण भागात राजकीय संदेशही तितकाच महत्त्वाचा असतो. आमदार अर्जुनराव खोतकर हे शिवसेनेतील ज्येष्ठ नेते असून, त्यांचा जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठा प्रभाव आहे. जलपूजनाच्या माध्यमातून त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत विकासकामांबाबतची आपली बांधिलकी अधोरेखित केली.

स्थानिक नेते व पदाधिकारी यांची उपस्थिती ही खोतकर यांचे संघटनात्मक बळ दाखवणारी ठरली. ग्रामस्थांनी जलाशयाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करत केलेले स्वागत हे आगामी राजकीय समीकरणांसाठी अनुकूल संकेत मानले जात आहेत.

संत गाडगेबाबा जलाशयाचा जलपूजन सोहळा हा केवळ धार्मिक वा सांस्कृतिक कार्यक्रम न ठरता, त्यातून सामाजिक-जागृती, आर्थिक उन्नती आणि राजकीय संदेश - हे तीनही पैलू अधोरेखित झाले. ग्रामीण भागातील पाणीप्रश्नावर दिलेला भर हा ग्रामस्थांच्या अपेक्षा पूर्ण करणारा ठरला असून, त्यामुळे खोतकर यांच्या नेतृत्वाला स्थानिक जनतेत आणखी बळकटी मिळाल्याचे दिसते.

# होऊन एक सारे हातात घ्या तिरंगा

## कविसंमेलन: मसाप तर्फे कविता स्वातंत्र्याची मध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषद जालना शाखेच्या वतीने एका हॉटेलमध्ये कविता स्वातंत्र्याची या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. सहभागी कवींनी जात, पंथ, धर्म, भेद विसरून भारतीय म्हणून एक होऊया असा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

सिने कलावंत,नाटककार, कवी संभाजी तांगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कविसंमेलनात ॲड. विठ्ठल काष्टे, रत्नमाला मोहिते, अशोक डोरले, राज रणधीर, गणेश खरात, नारायण खरात या निमंत्रित कवींनी लोकशाही ठोकशाहीची भांडण, वस्तीत झोपलेले नाग, भाकरीसाठी रडणारी चिली- पिली,तर दुसरीकडे झोपेच्या गोळ्या ही देशातील आर्थिक विषमता, पुस्तक, वर्तमानपत्राऐवजी इलेक्ट्रॉनिक यंत्राने मानवाच्या मेंदूवर मिळवलेला कब्जा, नैसर्गिक सौंदर्य, साधनसंपत्ती, नटलेल्या देशात गुण्या गोविंदाने नांदणारी संस्कृती, यावर आधारित महान भारत नद्यांना येणारा पूर , चिखल तुडवत ग्रामीण भागात आजही दळणवळणाची फरपट तर दुसरीकडे विमानतळाची उभारणी असा प्रगतीचा विरोधाभास, अशा विविध विषयांवर कवींनी प्रहार करत महिलांनी बंधने झुगारून द्यावी, रंग, प्रांत ,भाषा, धर्म, यावरून दंगे न करता सारे एक होऊन हातात तिरंगा घेऊ या असा एकतेचा संदेश दिला. यावेळी नूतन कार्यकारिणी व संचालक मंडळाचा संभाजी तांगडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक संयोजक राजाराम जाधव यांनी केले. निवेदन प्राचार्य रंगनाथ खेडेकर यांनी तर मसापचे सचिव पंडितराव तडेगावकर यांनी आभार मानले.

यावेळी रेखा बैजल, डॉ संजीवनी तडेगावकर, सुभाष कोळकर, मसाप जालनाचे अध्यक्ष रवींद्र तौर, उपाध्यक्ष डॉ. प्रभाकर शेळके, सहसचिव बाळासाहेब तनपुरे, शिवाजी कायंदे, शिवकुमार बैजल, मधुकर जोशी, इंजि. रवींद्र हुशे, विनीत साहनी, सुनील लोणकर, लक्ष्मीकांत दाभाडकर, शरद देशमुख, प्रकाश कुंडलकर, गजानन कायंदे, उदय देशमुख, नितीन कानडे, उत्तमराव शेजवळ, दिनेश शेळके, विलासराव देवडे, नागोराव भगत, पृथ्वीराज जाधव, आदित्य कोल्हे यांच्या सह काव्य रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### संभाजी तांगडे यांचे शाहीरी फटकारे !

सिने कलावंत, नाटककार, कवी संभाजी तांगडे यांनी शेतकरी पोवाडा व अभिजात स्वातंत्र्य या अंगाने अलिकडे सर्वच पातळ्यांवर स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. यासाठी लेखक, कवी सतत निर्भीड पध्दतीने बोलत लिहित राहणे आवश्यक.ठराविक संघटनांच्या आक्षेपानंतर चित्रपटावरील बंदी, राज्यात लाखांनी निघालेले मोर्चे,दिल्लीतील शेतकऱ्यांचे आंदोलन याबद्दल सरकारकडून न मिळालेला प्रतिसाद अशा विदारक परिस्थिती वर तांगडे यांनी शाहीरीतून फटकारे मारले. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असतांना लेखक, कवींनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडण्यासाठी तयार असायला हवे. अशी अपेक्षा तांगडे यांनी व्यक्त केली.

# उत्सवांना विधायक वळण द्या

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ज्या हेतूने गणेशोत्सव, शिवजयंती असे उत्सव सुरू केले त्याच्यामागे फार मोठी भूमिका होती आणि विचार होता. काळानुसार उत्सवाचे स्वरूप बदलले हे मात्र नक्की. कार्यक्रमातून उत्सवामधून जे काही फलित व्हायला हवे ते होत नाही. अनेक ठिकाणी गणेशोत्सवात रस्त्यामधून मंडप टाकले जातात वाहतुकीला अडथळ्याचे ठरतात. उत्सवाची वर्गणी मागण्यासाठी बऱ्याच वेळा जबरदस्ती केली जाते मिरवणुकीमध्ये डीजेचा डॉल्बीचा लेझर किरणांचा वापर केला जातो आरोग्य दृष्टीने ते घातक असते. आंधळेपणा ,बहिरेपणा ,उच्चदाब असणाऱ्यांना बऱ्याच वेळा धोका झालेला आहे काही प्रकरणात तर मृत्यू ओढवलेला आहे .मिरवणुकीमध्ये बऱ्याच ठिकाणी मद्यपान करून दिवसभल अर्थहीन गाण्यावर नाच केला जातो, सर्वच ठिकाणी सारखी परिस्थिती असते असे नाही. काही मंडळांमध्ये अतिशय शिस्तबद्ध पणे आरती केली जाते आणि कार्यक्रमाची आखणी केली जात असते. परंतु अशा मंडळांची संख्या फारच कमी असते. हे प्रमाण ८०/ २०% असे असते अनेक ठिकाणी चांगल्या कार्यक्रमाचे आयोजनही केलेले असते.

गेल्या काही वर्षांमध्ये अशा उत्सवामध्ये राजकारणी नेत्यांचा प्रवेश झाल्यामुळे उत्सवाचे स्वरूपच पालटले आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळतात त्यामुळे वेगळ्या प्रकाराने कार्यक्रमाचे आयोजन होते. त्यात त्यांचाही सहभाग असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमा नियमाचे बंधन पाळले जात नाही आणि अधिकारी असहाय्य असतात. होणाऱ्या त्रासामुळे मात्र बऱ्याच वेळा जनता नाराज असते. आणि म्हणूनच मग उद्विग्न अवस्थेतून संतापाने बंद करा हा गणेशोत्सव अशा प्रतिक्रिया काही जणांकडून उमटतात. अर्थातच असे आपले धार्मिक उत्सव बंद होणे शक्य नाहीच फक्त त्यात काही सुधारणा आणि विधायक कार्य होणे अपेक्षित आहे. गणपतीला विद्येची देवता,चौसष्ट कलांचा अधिपती आणि विघ्नहर्ता, संकट विमोचक म्हणतात. आपण कुठल्याही कार्याची सुरुवात करताना श्री गणपतीचे पूजन करतो आपले कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी प्रार्थना श्री गणपती समोर करतो. गणपती माझा नाचत आला, गणपती बाप्पा आले घरा,

घराचे मंदिर झाले.. बघा, असे म्हणत आपण घरोघरी शोडपचारे पूजा करून गणपतीची स्थापना करीत असतो. मोदकांचा नैवेद्य दाखवत असतो.

महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात पेशव्यांचे काळात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून दशमी पर्यंत सात दिवस हा उत्सव होत होता. गणेश उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप १८९३ सालापासून मिळाले त्यावेळी लोक जागृतीचे एक मुख्य साधन म्हणून प्रबोधनाचे स्वरूप दिले. लोकमान्य टिळकांनी समाजात एक्याची भावना वाढावी या हेतूने गणेशोत्सवाची त्यासाठी निवड केली आणि त्यावेळी हा उत्सव गणेश चतुर्थी पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत असा दहा दिवस सुरू करण्यात आला. त्यावेळच्या परिस्थितीत सर्व समाजाला एकत्र करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी हा त्यामागचा मोठा उद्देश होता. अर्थातच स्वातंत्र्य आंदोलनात सार्वजनिक गणेशोत्सवात जे लोक जागृती कार्य केले ते उल्लेखनीय आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुण्यात झाली आणि हळूहळू तो संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होऊ लागला.

राजकीय व्यक्तिंच्या प्रवेशामुळे,पाठबळामुळे उत्सवांना वेगळे स्वरूप प्राप्त होत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. कारण राजकीय व्यक्तींकडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी अशा मंडळांना मोठ्या मोठ्या देणग्या देऊन आकृष्ट केले जाते. परिणामी हा पैसा योग्य कामी खर्च न होता फक्त डी.जे, रोशणाई, मोठ मोठ्या मूर्ती आणि इतर अनेक कारणासाठी खर्च होतो, फार कमी मंडळाकडून विधायक कामे होतात. गणेश मंडळात असणारी बहुसंख्य मंडळी ही तरुणच असते आणि अशावेळी त्या मंडळाकडून होणाऱ्या कार्यक्रमाला विधायक स्वरूप कसे प्राप्त होईल, सामाजिक ऐक्य कसे टिकून राहील, पर्यावरणाचा विचार कसा केला जाईल किंवा प्रदूषण निर्माण होणार नाही याची दखल घ्यायला हवी. उत्सवात पूजेसाठी मातीची मूर्ती असावी असे उल्लेख आहेत. आणि संकल्पात सुद्धा मृण्मय पार्थिव महागणपती पूजनं करिष्ये. असे म्हणण्याचा प्रघात आहे .कारण कर्मकांडातील बहुतेक पूजा ह्या विशेष कालावधीनंतर विसर्जित केल्या जात असतात, म्हणूनच घरात आणली जाणारी गणपतीची मूर्ती ही आपल्याला स्वतःला आणता येईल एवढे असावी, अनेक ठिकाणी महापालिकांनी पी.ओ.पी. गणेश मूर्तीवर बंदी आणलेली आहे. प्रदूषण महामंडळाकडून त्याविषयी आदेश काढले जातात.

गणेशोत्सव हा तर महाराष्ट्रातला सगळ्यांचा आवडता आणि मोठा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सध्याच्या परिस्थितीत ह्या उत्सवाचे स्वरूप खूप बदलले आहे.धार्मिकते पेक्षा ईतर गोष्टींना महत्व दिले जाते. मोठया मूर्ती, देखावे झगमगाट,रोषणाई, डी.जे.च्या तालावर कर्कष्य गाणी,हे प्रमाण वाढले आहे. बाजारात सिंगल यूज प्लास्टिक मध्ये सजावटीच्या प्लास्टिकच्या फुलांचा समावेश नसल्याने बाजारपेठेचत सर्रास विकले जातात.

लोकमान्य टिळकांनी ज्या विचारांनी घरातल्या गणपती बरोबरीने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली,त्याचा जवळपास विसर पडल्या सारखा झाला आहे.अगदीच तुरळक मंडळात गणपती अथर्वशीर्षाचे पठण होते. पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला ऋषिपंचमीला दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्षाचे पठण करतात.काही ठिकाणी अथर्वशीर्ष पठणाच्या स्पर्धा घेतल्या जातात. काही वर्षापूर्वी गणेश व्याख्यानमाला सारखे उपक्रम केले जात होते.निरनिराळ्या विषयावरचे विचार ऐकायला मिळायचे. देखावे,रोषणाई, तर करावीच पण ह्या गोष्टीलाही प्राधान्य होते आता काही ठराविक ठिकाणीच असे व्याख्यानमालाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अथर्वशीर्ष पठण स्पर्धा घेतल्या जातात. डी.जे.च्या कर्कष्य तालावर जी गाणी लावली जातात,तो प्रकार कुठेतरी थांबावा असे वाटते.उत्सव साजरा करण्यातूनच आनंद,समाधान, जरुर मिळायला हवे पण त्यापासून कोणाला त्रास होणार नाही हा विचारही असायला हवा. म्हणूनच हा उत्सव साजरा केला जातो उत्सवा मागचे खरे धार्मिक,सांस्कृतिक, प्रबोधन महत्वाचे विषयांचा, उद्देशाचाही विसर पडायला नको. उत्सव साजरा करताना जर आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या उत्सवाचे हेतू आणि पावित्र कायम राहील गणेश मूर्ती निवडताना ती शाडूच्या मातीची किंवा इको फ्रेंडली असावी. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा थर्मोकोलची नसावी. मूर्तीची उंची प्रमाणात असावी.

उत्सवात आकर्षक पण कमी वीज लागणारी रोषणाई केली तर विजेची बचतही होते. आरास करतानाही ती पर्यावरण पूरक तसेच आरोग्यासाठी हानिकारक ठरणार नाही असेच रंग वापरावे. सरकारने बंदी आणलेल्या प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी. उत्सवाचे काळात आपल्या उत्साहामुळे म्हणजेच डी.जे लाउड स्पीकर याच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरातील दवाखाने, शाळा, यांना त्रास होणार नाही हे बघायला हवे. रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही ही काळजी हवी.

मूर्ती विसर्जनाच्या वेळी ठीक ठिकाणी तात्पुरते तळे किंवा तलाव त्या त्या ग्राम पंचायत नगरपालिका यांनी उपलब्ध करून द्यावे. अपप्रकर घडणार नाही अपप्रवृत्तीचा शिरकाव होणार नाही याची काळजी मंडळाचे कार्यकर्त्यांनी घ्यावी.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेत जो सांस्कृतिक वैभवचा ठेवा दिला आहे त्या निमित्ताने या उत्सवात सर्वांनी एकत्र यावे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे व्हावे, स्पर्धा व्हाव्यात एकमेकात बंधूभाव, देशप्रेम निर्माण व्हावे आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य कायम ठेवून लोकसंस्कार व्हावे तरच गणेशोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

सगळे सण,उत्सव साजरे करत असताना सामाजिक भान ठेवायला हवे. आपल्या संस्कृतीला शोभेल असेच धार्मिक आणि विधायक कार्यक्रम आखून उत्सव साजरे व्हावेत.

अशा प्रकारचे उत्सव, सण, हा सर्व आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. ठिकठिकाणी गणपती मंडळांनी या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आता शासनाने गणेशोत्सवाला राज्याचा उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्या दृष्टीने त्यांनी आखून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राजकीय नेत्यांचा कार्यक्रमास सहभाग असला तरी त्यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप बिघडणार नाही याची दक्षता घ्यायला हवी.

राज्य उत्सव म्हणून जिल्ह्या जिल्ह्यात उत्कृष्ट विधायक कार्य करणाऱ्या, देखावे सादर करणाऱ्या, आणि नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना बक्षिसे जाहीर करून त्यांचा सत्कार करावा त्या निमित्ताने उत्कृष्ट कार्य करण्याची मंडळांमध्ये चढाओढ लागून मंडळाच्या कामात शिस्त निर्माण होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही.



बोला गणपती बाप्पा मोरया..

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा.नं.८९९९५६६९१७**
dilipdeshpande@gmail.com

## जालना अतिवृष्टी अनुदान घोटाळा

# निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप, एसआयटी चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांसाठी मंजूर अनुदान वाटपात तब्बल ७९.६७ कोटी रुपये (७९६,७९७,०३८ रुपये) अपहाराचा घोटाळा उघडकीस आला आहे. या प्रकरणाने शेतकरी आणि राजकीय वर्तुळात प्रचंड संताप पसरला आहे. आज परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार आणि माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी पत्रकार परिषद घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख असलेल्या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी हे या घोटाळ्यात प्रत्यक्ष सामील असून, दोषी कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी कागदपत्रे दडवत असल्याचा दावा केला आहे. लोणीकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची ड्खढ मार्फत तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून या घोटाळ्याची खरी व्याप्ती, जी १५० कोटींहून अधिक असू शकते, समोर येईल.

लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत संतप्तपणे सांगितले की, निवासी उपजिल्हाधिकारी हे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेचे मूळ केंद्रबिंदू आहेत. त्यांनी दोषी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक आणि तहसीलदार यांना संरक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक ऋखठ दाखल करण्यास टाळाटाळ केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी घोटाळ्याचे अनेक कागदपत्र दाबून ठेवले आहेत. त्यांनी मोठमोठे आकडे लपवले असून, या भ्रष्टाचाराची खरी रक्कम १५० कोटींहून जास्त आहे. ड्खढ चौकशीशिवाय या प्रकरणाची सत्यता समोर येणार नाही, असे लोणीकर यांनी ठणकावले. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

**घोटाळ्याचा तपशील: जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल**

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी नेमलेल्या आठ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानुसार, अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील एकूण अपहार रक्कम ७९६,७९७,०३८ रुपये (७९.६७ कोटी रुपये) आहे. यातील तपशील खालीलप्रमाणे आहे:

अंबड तालुका (१३८ गावे), बोगस शेती नसलेले खोटे लाभार्थी: १४,३५४ लाभार्थी, अपहार रक्कम ३३९,१७१,३५४ रुपये., डबल/दुबार अनुदान लाभार्थी: २,३१९ शेतकरी, अपहार रक्कम ४१,७६०,३८४ रुपये., क्षेत्र वाढवून बोगस अनुदान: ३,०९७ लाभार्थी, अपहार रक्कम ६१,५०१,८९६ रुपये., शासकीय जमिनीवर अनुदान: २२ प्रकरणे, अपहार रक्कम ६७३,७६० रुपये., एकूण अपहार रक्कम: ४४३,१०७,३९४ रुपये.,

घनसावंगी तालुका (११५ गावे), बोगस शेती नसलेले लाभार्थी: ११,९६१ लाभार्थी, अपहार रक्कम २१२,१००,८९५ रुपये., डबल/दुबार अनुदान लाभार्थी: १०,५४५ शेतकरी, अपहार रक्कम १२५,९७१,४४८ रुपये., क्षेत्र वाढवून बोगस अनुदान: ८६१ लाभार्थी, अपहार रक्कम १५,१०४,०१६ रुपये., शासकीय जमिनीवर अनुदान: २२ प्रकरणे, अपहार रक्कम ५१३,२८४ रुपये., एकूण अपहार रक्कम: ३५३,६८९,६४४ रुपये., एकूण अपहार (अंबड + घनसावंगी) रक्कम ७९६,७९७,०३८ रुपये (७९.६७ कोटी रुपये).

लोणीकर यांनी सांगितले की, हा अहवाल केवळ घोटाळ्याची प्राथमिक माहिती आहे. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी अनेक पुरावे आणि कागदपत्रे दडवल्यामुळे खरा आकडा १५० कोटींहून जास्त असण्याची शक्यता आहे. त्यांनी या प्रकरणात तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून बोगस एंट्री केल्या गेल्याचा उल्लेख केला, ज्यात तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक आणि मंडळ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवरील गंभीर आरोप**

लोणीकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर खालीलप्रमाणे गंभीर आरोप केले आहेत:

**दोषी कर्मचाऱ्यांना संरक्षण:** निवासी उपजिल्हाधिकारी हे ७६ ते ८९ दोषी कर्मचाऱ्यांना, यात १७ तलाठी, ५ तहसील लिपिक आणि २ कृषी सहायक (के.जी. कचकलवाड आणि एस.पी. रगडे) यांचा समावेश आहे, वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत केवळ ५७ कर्मचारी निलंबित झाले असून, यात निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचा हस्तक्षेप असल्याचा दावा आहे.

**कागदपत्रांचा गैरवापर आणि दडपशाही :** घोटाळ्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे कागदपत्रे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दाबून ठेवली आहेत. यामुळे घोटाळ्याची खरी व्याप्ती आणि मोठ्या रकमेचा अपहार लपवला गेला आहे.

**एफआयआर दाखल करण्यास टाळाटाळ:** ९ ऑगस्ट २०२५ रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोषींवर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र, १७ ऑगस्ट २०२५ पर्यंत कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही, आणि याला निवासी उपजिल्हाधिकारी जबाबदार असल्याचे लोणीकर यांनी ठणकावले.

**घोटाळ्याची व्याप्ती लपवणे :** जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालात ७९.६७ कोटींचा अपहार नोंदवला आहे, पण लोणीकर यांनी दावा केला की, निवासी उपजिल्हाधिकारी यांनी लपवलेल्या माहितीमुळे हा आकडा १५० कोटींहून जास्त आहे.

**राजकीय दबावाचा संशय :** निवासी उपजिल्हाधिकारी हे स्थानिक प्रशासनावर राजकीय दबाव आणत असून, भ्रष्टाचारातील मोठ्या मासेमारींना संरक्षण देत असल्याचा आरोप लोणीकर यांनी केला आहे.

**आतापर्यंतची कारवाई आणि निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची भूमिका**

चौकशी समितीने ७६ ते ८९ कर्मचारी दोषी ठरवले असून, जून २०२५ मध्ये १० तलाठी, जुलैमध्ये २१ आणि ऑगस्टमध्ये २ कृषी सहायक निलंबित झाले आहेत. आतापर्यंत ५.७४ कोटी रुपये वसूल झाले आहेत, पण मोठी रक्कम वसूल करणे बाकी आहे. लोणीकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर प्रशासकीय चालढकलीचा आरोप केला आहे. त्यांनी सांगितले की, महसूलमंत्र्यांनी ऋखठ चे आदेश देऊनही निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कारवाईला अडथळा आणला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे.



**एसआयटी चौकशीची मागणी आणि शेतकऱ्यांचा संताप**

लोणीकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची ड्खढ किंवा उइख मार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, निवासी उपजिल्हाधिकारी हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख असल्याने त्यांची जबाबदारी मोठी आहे, पण त्यांनी ही जबाबदारी पार पाडण्याऐवजी भ्रष्टाचाराला खतपाणी घातले आहे. शेतकरी आत्महत्या करत असताना, त्यांच्या हक्काच्या पैशावर भ्रष्ट अधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी डल्ला मारत आहेत. ही लज्जास्पद बाब आहे, असे लोणीकर यांनी संतप्तपणे म्हटले. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्र्यांकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांमध्ये या घोटाळ्यामुळे प्रचंड रोष आहे. विरोधी पक्षांनी, विशेषतः काँग्रेसने, सरकारवर टीका करत शेतकऱ्यांच्या पैशावर लुट असल्याचा आरोप केला आहे. लोणीकर यांनी यावरून सरकारला पाठिंबा देताना सांगितले की, सरकार कारवाईसाठी कटिबद्ध आहे, पण निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांसारखे अधिकारी याला खीळ घालत आहेत.

**लोणीकर यांची भूमिका आणि पाठपुरावा**

लोणीकर यांनी या घोटाळ्याचा पर्दाफाश करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी १४ जून २०२५ रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित केला, जुलै २०२५ मध्ये विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना दिली आणि ११ ऑगस्ट रोजी द वर दोषी २ तहसीलदार आणि ७४ कर्मचाऱ्यांवर ऋखठ ची मागणी केली. त्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की, ते या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करतील आणि निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून ड्खढ चौकशीतून सर्व दोषींवर कठोर कारवाई होईल.

**पुढील मार्ग आणि अपेक्षा**

लोणीकर यांनी डिजिटल अनुदान वितरण प्रणाली मजबूत करण्याची गरज व्यक्त केली आहे, जेणेकरून भविष्यात असे घोटाळे टाळता येतील. या प्रकरणाने मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांतही अनुदान वाटपाची चौकशी तीव्र केली आहे. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी १५ ऑगस्ट रोजी कारवाईची ग्वाही दिली होती, पण निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवरील आरोपांमुळे हे प्रकरण नव्या वळणावर आले आहे. ड्खढ चौकशी होणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**लोणीकर यांचे आवाहन**

शेतकऱ्यांचा पैसा हा त्यांचा हक्क आहे. निवासी उपजिल्हाधिकारी आणि इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांनी या पैशावर डल्ला मारला आहे. मी स्वतः या प्रकरणात ड्खढ चौकशी होईपर्यंत आणि सर्व दोषींना तुरुंगात टाकेपर्यंत लढत राहीन. शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असे लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत ठणकावले.

## बदनापूरात तालुकास्तरीय प्लास्टीक संकलन व प्रक्रिया युनिटचे उदघाटन




**जालना । प्रतिनिधी -** बदनापूर येथे तालुकास्तरीय प्लास्टीक संकलन व प्रक्रिया युनिटचा उदघाटन सोहळा राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.बारगिरे, गटविकास अधिकारी ज्योती राठोड, भास्कर दानवे, बद्री पठाडे यांची उपस्थिती होती.

## समाजभानच्या 'दो बुंद देश के नाम' शिबीरात ८२ दात्यांनी केले रक्तदान

**अंबड । प्रतिनिधी -** समाजभान टीमच्यावतीने 'दो बुंद देश के नाम' या संकल्पनेखाली गत काही वर्षांपूर्वी सुरू केलेली रक्तदान चळवळ अखंडीतपणे सुरू असून स्वातंत्र्य दिनी (ता.१५) आयोजित समाजभान टीमच्या १६६ व्या रक्तदान शिबिरात ८२ दात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.

अंबड शहरातील डॉ. एकनाथ नवसागर यांच्या संत तुकाराम हॉस्पिटलमध्ये स्वातंत्र्यदिनाच्या औचित्यावर तसेच समाजभानचे सक्रिय सदस्य तथा शिक्षक सोपान पाष्टे व योगेश कव्हळे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजभानच्यावतीने आयोजित या शिबिरास रक्तदात्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.पावसाचे वातावरण असतांनाही ८२ रक्तदात्यांनी रक्तदान करून आगळ्यावेगळ्या प्रकारे स्वातंत्र्यदिन साजरा केला.

या शिबिरामध्ये ६ महिला रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तपणे रक्तदान करून इतर महिलांनीही कुठेही असो रक्तदान अवश्य करावे असे आवाहन केले. समाजभान टीमच्यावतीने 'दो बुंद देश के नाम' या संकल्पनेखाली वर्षांत २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन,१ मे महाराष्ट्र दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन आणी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन या ४ दिवशी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येतात.समाजभान टीमने विविध ठिकाणी १६५ शिबीर घेतले असून आजचे हे १६६ वे शिबीर होते.

जालना येथील जनकल्याण रक्तपेढीच्या टीमकडून रक्त संकलन करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी समाजभान टीमचे दादासाहेब थेटे, गणेश मिरकड, योगेश कव्हळे,सोपान पाष्टे,धनंजय म्हस्के,अशोक शहा,प्रा.मारोती घुगे,प्रा.संतोष आडे, संतोष जिगे,संदीप सातपुते, दादासाहेब जंगले,सुभाष काळे,विष्णू शेळके,मोईन शेख,सतीश पवार, संतोष मोटे,सुभाष वाघ,संजय थोरात त्याचप्रमाणे डॉ. एकनाथ नवसागर व त्यांचा स्टॉप आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी समाजभान टीमच्यावतीने रक्तदानाच्या या यज्ञात सहभागी झाल्याबद्दल सर्व रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.






जालना शहरात गणेशोत्सवाची धूम सुरू झाली असून मामा चौक येथे तब्बल ३० फूट उंच गणपती बाप्पाचे आगमन झाले. या आगमनामुळे परिसरात उत्साह आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या संख्येने नागरिक, युवकांनी उपस्थित राहून या क्षणाचे साक्षीदार ठरले. मामा चौकातील हा तीस फूटांचा गणपती जालना शहरातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.